23

# जागतिक शांतता आणि दहशतवाद

सहयोगी प्रा.डॉ.डोंगरे एल.बी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर, जि.नांदेड

दहशतवाद ही एका राष्ट्रापुरती सिमित समस्या नसुन ती एक जागतिक समस्या बनली आहे. दहशतवादाने संपुर्ण जगाला प्रभावित केले आहे. दहशतवादाने संपुर्ण देशांच्यासमोर एक मोठे आव्हान उभे केले आहे. राष्ट्र राज्य व्यवस्था निर्माण झाल्यानंतर सर्व राष्ट्र ही सार्वभौम झाली. या सार्वभौम राष्ट्रावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व राष्ट्रांनी मिळून संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना २४ ऑक्टोबर १९४५ मध्ये करण्यात आली. संयुक्त राष्ट्राच्या सनदेवर सर्व राष्ट्राच्या राष्ट्र प्रमुखांनी स्वाक्षज्या केल्या आहेत. सनद स्विकारत असतांना सर्वांनी यातुन एक शांत सुरक्षीत आणि सुंदर जगाच्या निर्मितीचे उदात्त स्वप्न पाहिले होते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सॅन फ्रान्सीसको संमेलनात संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेवेळी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्र अध्यक्ष ट्रुमन यांनी ही तर विश्व शांतता युगाची सुरुवात आहे असे उद्‌गार काढले होते. पण ही शांतता भंग करण्याचे विकृत कार्य दहशतवादाने केले आहे. यामुळे संपुर्ण जग आज अशांत आणि दहशतीच्या सावटाखाली आहे. संयुक्त राष्ट्राच्या सनदेच्या प्रस्तावनेत संपुर्ण विश्वातील मानवजातीला सुखी समाधानी शांतीमय जीवन जगता यावे यासाठी लागणारे सर्व कार्य करण्याची तयारी संयुक्त राष्ट्राची आहे. संयुक्त राष्ट्रांच्या या कार्यात सर्व राष्ट्रांनी सहकार्य करणे अपेक्षीत आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेने जगात जागतिक शांतता प्रस्थापीत करण्यासाठी १९८६ हे आंतरराष्ट्रीय शांतता वर्ष म्हणून घोषीत केले. याशिवाय सन २००१-२०१० हे दशक शांती आणि अहिंसेचे दशक म्हणून घोषीत केले. संयुक्त राष्ट्राच्या शांतता प्रस्थापनेबाबत महासचीव डाग हॅमरशील्ड यांनी असे म्हणाले होते संयुक्त राष्ट्राची स्थापना मानवाला स्वर्गात जाण्यासाठी केलेली नसून मानवतेला नरकात जाण्यापासून वाचवण्यासाठी केलेली आहे.

परंतु दहशतवाद या जागतिक समस्येने तमाम मानवजातीला नरकात ओढले आहे. दहशतवादाने जगातील सर्व राष्ट्रात आपली

पाळेमुळे मजबुत केले आहे. त्यांच्या दहशतवादी कारवायामुळे संपुर्ण राष्ट्रे ही अशांत आणि असुरक्षीत झाली आहेत. दहशतवादासारख्या जागतिक समस्येने जगातील सर्व राष्ट्रासमोर एक मोठे आव्हान उभे केले आहे. अशा या दहशतवादी प्रवृत्तीचा बिमोड करण्यासाठी संयुक्त राष्ट्र आणि जगातील सर्व देशांनी एकत्र येऊन सामुहिक लढा दिल्याशिवाय दहशतवादाचा शेवट होणार नाही.

बैरुत पासून लंडन पर्यंत, बगदाद पासून न्युयॉर्क पर्यंत आणि बालीपासून मुंबई पर्यंत सर्व शहरे दहशतवादाचे लक्ष बनलेली आहेत. दहशतवाद म्हणजे जनतेच्या मनात भिती निर्माण करण्यासाठी हिंसात्मक कृती करणे म्हणजे दहशतवाद होय. राज्यशास्त्र शब्दकोषानुसार आमुलाग्र राजकीय आणि सामाजिक परीवर्तन घडवून आणण्याच्या हेतुने शासनावर दबाव आणण्यासाठी हिंसाचाराच्या मार्गाचा अवलंब करणे होय.

आजच्या एकविसाव्या शतकात विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे विध्वंसकारी आणि विनाशकारी शस्त्रास्त्र निर्माण करण्याचे तंत्रज्ञान विकसीत झाले. महासत्तावान देशांनी आपल्या प्रगत तंत्रज्ञानाच्या बळावर मानवी अस्तीत्व नष्ट करणारे विध्वंसकारी आणि विनाशकारी शस्त्रे निर्माण केली. अणुबॉम्ब, हायड्रोजन बॉम्ब, जैवीक शस्त्रात्र ही दहशतवादयांच्या हाती लागली आहेत. अशा विध्वंसकारी आणि विनाशकारी शस्त्रांचा वापर जर दहशतवादयांकडून झाला तर ही पृथ्वी हजारो वेळा नष्ट करण्याचे सामर्थ्य या शस्त्रास्त्रामध्ये आहे. म्हणुन दहशतवाद आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकसीत झालेल्या हया शस्त्रास्त्रामुळे जागतिक शांतता आणि असुरक्षीतता निर्माण होऊन जागतिक शांतता भंग होत आहे. हे नाकारुन चालणार नाही.

यासाठी जगातील सर्व राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रांच्या तत्त्वाशी एकनिष्ठ राहून दहशतवादविरोधी कार्यात तत्पर मदत करुन मानवजातीवरील दहशतवादाचा लागलेला कलंक पुसण्यास मदत करावी. दहशतवादाच्या माध्यमातून होणारे नैतिक मुल्यांचे अधःपतन थांबविण्यासाठी संयुक्त राष्ट्राने १९६० नंतर दहशतवादविरोधी धोरण आखले आहे. १९८५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या महासभेने दहशतवाद विरोधी धोरण आखले होते. १९८५ ला युनोच्या महासभेने दहशतवादाचा निषेध करणारा ठराव पारीत करुन दहशतवादाला सहकार्य करणा-या राष्ट्रांचा निषेध करण्यात आला. संयुक्त राष्ट्र संघटनेने दहशतवादाचा बिमोड करुन जागतिक शांतता प्रस्थापीत करण्यासाठी केलेल्या कार्यांचा आणि धोरणांचा सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे.

युरोपीय देशात सर्वप्रथम इंग्लंड या राष्ट्राला दहशतवादाची सर्वाधिक झळ पोहचली आहे. दुस-या महायुध्दानंतर मध्य आशिया खंड हे दहशतवादाचे केंद्र बनले. त्याचे कारण शितयुध्द होते. शितयुध्दामुळे अमेरिका आणि रशिया या महासत्तांनी जागतिक संस्था संघटनांवर आपले वर्चस्व प्रस्थापीत करण्यासाठी स्पर्धा सुरु केली. महासत्ता होण्याच्या स्पर्धेत या दोन्ही महासत्तावान देशांनी अत्याधुनिक शस्त्रास्त्र निर्माण केली. शस्त्रास्त्राच्या बळावर एकमेकांना नमवू पाहत होत्या. १९४५ ते १९८९ पर्यंत चाललेल्या या संघर्षास शितयुध्द असे म्हणतात. याच शितयुध्दात दहशतवादाची पाळेमुळे दिसून येतात. अमेरिका आणि रशिया या देशांनी एकमेकांवर मात करण्याच्या प्रयत्नातून दहशतवादाला दोघांनीही खतपाणी घातले. यातून अमानवी, अनैतिक असा दहशतवाद विकसीत होत गेला. या दहशतवादाचे कालपरत्वे, देशपरत्वे स्वरुप भिन्न भिन्न असली तरी हिंसात्मक कृत्य करुन जागतिक शांतता भंग करणे हे त्याचे ध्येय आहे.

अशा पध्दतीने विविध राष्ट्रात विविध दहशतवादी संघटना निर्माण झाल्या. या दहशतवादी संघटनांनी जगभरात अनेक निरापराध माणसांचा बळी घेतला. लाखो लोकांना बेघर करुन राष्ट्राच्या मालमत्तेचे नुकसान केले. दहशतवादी हल्ल्यात मृत पावलेली व्यक्ती, जखमी झालेली व्यक्ती, हिंसात्मक हल्ल्यात मालमत्तेचे नुकसान यावरुन दहशतवादाचा निर्देशांक किती आहे याचे विश्लेषण करता येते.

सन २०१८-२०१९ च्या आकडेवारीनुसार सर्वात अधिक दहशतवादाच्या प्रभावाखाली असलेल्या दहा राष्ट्रांचा आढावा घेतल्यास अफगानिस्तान प्रथम क्रमांकावर आहे. भारत आठव्या स्थानी आहे. तर दहाव्या स्थानी फिलिपाईन्स आहे. जागतिक पातळीवर दहशतवादामुळे प्रभावित होणाज्या भुभागाचा विचार करता आशिया खंडात सर्वाधिक हिंसात्मक कारवाया दहशतवादयांनी केल्या आहेत. यावरुन हे दिसून येते की, दहशतवादाच्या हिंसात्मक कारवायामुळे आशिया खंडात अर्थात जगात अशांतता, असुरक्षीतता निर्माण झाल्याचे दिसून येते. म्हणुन दहशतवादामुळे जागतिक शांतता आणि सुरक्षीतता भंग करण्यात दहशतवादाचे खुप मोठे योगदान आहे हे सिध्द होते. दहशतवादाने मानवी मुल्यांचे हनन केले आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेचे महत्त्व आणि अस्तीत्व महासभेमुळे टिकून आहे. सुरक्षा परिषद हे महासत्तावान राष्ट्राच्या संघर्षाचे कारण बनले आहे. त्यामुळे जागतिक शांतता निर्माण करण्यात अडथळे निर्माण झाले आहे. सुरक्षा परिषदेतील पाच महासत्तावान राष्ट्रांना मिळालेला नकाराधिकार हा जगात जागतिक शांतता आणि सुरक्षीतता निर्माण करण्यासाठी झाला आहे. पण तसे न होता सुरक्षा परिषदेतील ही पाच सदस्य राष्ट्रे हिंसात्मक कारवाया करणाज्या राष्ट्रांचे समर्थन करण्यासाठी कधी कधी नकाराधिकाराचा वापर करतांना दिसून येतात हे दुर्देव आहे.

मध्य आशिया खंड हे जागतिक दहशतवादाचे केंद्र बनले होते. त्याची व्यापकता जागतिक स्वरूपाची बनलेली दिसून येते. मध्य आशिया खंडात इराक हा सर्वाधिक हिंसा झालेले राष्ट्र ठरते. ऑस्ट्रेलियाने दहशतवादाची झळ बसलेल्या राष्ट्रांचा सर्वे केला. त्यामध्ये १० राष्ट्र सर्वाधिक दहशतवादाच्या प्रभावाखाली असल्याचे दिसून येते. त्यामध्ये भारत हा देश सातव्या स्थानावर दहशतवादी कारवायांना बळी ठरलेला देश आहे. सन २००० पर्यंत दहशतवादाचे केंद्र मध्य आशिया खंड होते. पण त्यानंतर संपुर्ण विश्वाला आपल्या प्रभावाखाली आणले. लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद, हिजबुल मुजाहिदीन, अलकैदा, हमास, ISIS या अतिशय धोकादायक आणि गंभीर दहशतवादी संघटनांचा प्रभाव जगातल्या विविध राष्ट्रांमध्ये दिसून येतो. अशा दहशतवादी संघटनाच्या नकारात्मक प्रभावातून मानवी जीवन अशांत आणि असुरक्षीत बनले आहे. अशा या दहशतवादी संघटनांच्या हिंसात्मक कारवायातून जागतिक शांतता आणि सुरक्षीतता भंग होतांना दिसून येते. म्हणून जागतिक शांतता आणि सुरक्षीतता भंग होण्यास दहशतवाद कारणीभूत आहे हे यावरुन सिध्द होते.

पृथ्वी तलावरील मानवी अस्तीत्व, मानवी सभ्यता, संस्कृती, नैतिकता, मानवतावाद नष्ट करु पाहणा-या दहशतवादावर काही उपाययोजना केल्यास निश्चितच ही मानव निर्मित समस्या समुळ नष्ट होवून जगात पुन्हा जागतिक शांतता आणि सुरक्षीतता प्रस्थापीत करण्या मदत होईल.

दहशतवादाचे मुळ कारण गरीबी, बेरोजगारी, दारिद्रय आहे. प्रत्येक राष्ट्राने विविध कल्याणकारी योजना निर्माण करुन त्यांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास जनतेच्या जीवनमानात आणि राहणीमानात सुधारणा करुन दहशतवादास प्रतिबंध घालता येतो. याबरोबरच कार्यक्षम प्रभावी शासन यंत्रणा निर्माण करणे, जनतेमध्ये जागृती निर्माण करुन चांगले प्रतिनिधी निवडून दिले पाहिजे. ज्यामुळे शासनव्यवस्था गतिमान, पारदर्शक, लोकाभिमुख होण्यास मदत होते. दहशतवादी व त्यांना सहकार्य करणाज्या राष्ट्रावर आर्थिक निर्बंध टाकण्यात यावे. त्यासोबत अन्य राष्ट्रांनीही परस्पर सहकार्य आणि इच्छाशक्ती दार्खविल्यास दहशतवादास प्रतिबंध घालण्यास निश्चीत मदत होते. दहशतवादास प्रतिबंध घालण्यासाठी गुप्तचर यंत्रणा सजग व सतर्क असणे गरजेचे आहे. गुप्तचर संस्था आणि स्थानिक पोलीस यांच्यात समन्वयाची आवश्यकता आहे. दहशतवादाची स्पष्ट व्याख्या करुन दहशतवादी कारवाया करणाज्या ज्या संघटना आहेत. त्या संघटनांवर सामुहिक लष्करी कारवाईची आवश्यकता आहे. असे झाल्यास दहशतवादास प्रतिबंध घालता येऊ शकतो.

विज्ञान तंत्रज्ञानाचा वापर दहशतवादास प्रतिबंध घालण्यासाठी करण्यात यावा. समाज माध्यमांच्या माध्यमातून तरुण वर्गाच्या मनात मानवतावाद, नैतिकता, अध्यात्मीकता, राष्ट्रप्रेम, अहिंसा या मानवी मुल्यांचा प्रचार प्रसार समाजात करावा. अज्ञान आणि धार्मिक मुलतत्त्ववादातून अफवा, खोटा इतिहास, शोषण, हिंसकवृत्ती निर्माण होते. यातून मागास देशात दहशतवादाची शिकार बनतात. मानवी मुल्यांचे हनन झाल्यामुळे दहशतवाद निर्माण होतो. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संधाच्या मदतीने गरीब राष्ट्रात शिक्षणाची व्यवस्था करुन सुसंस्कृत समाज निर्माण केल्यास दहशतवादास आळा घालण्यास निश्चीत मदत होते.

**निष्कर्ष :-**

दहशतवाद ही एका राष्ट्रापुरती सिमीत समस्या नाही तर ती वैश्वीक समस्या आहे. जागतिक शांतता आणि सुरक्षीतता भंग करण्यात दहशतवादाचे मोठे योगदान आहे. दहशतवादाचा निपात करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने प्रभावी कृती आराखडा निर्माण करुन त्याच्या प्रभावी अंमलबजावणीची आवश्यकता आहे. दहशतवादी कारवाया करणा-या संघटनांना पाठीशी घालणाज्या राष्ट्राविरुध्द कठोर कारवाईची आवश्यकता आहे. धार्मिक मुलतत्त्ववादास प्रोत्साहन देणा-या घटकांना प्रतिबंध घालणे महत्त्वाचे आहे. धार्मिक हिंसात्मक आक्रमक शिक्षण देणाज्या संस्था, संघटनांवर प्रतिबंध घालण्यात यावे. गुप्तचर संस्था प्रभावी आणि कार्यक्षम करण्याची आवश्यकता आहे. अशा विविध मार्गाने विविध घटकाच्या समन्वयाच्या माध्यमातून दहशतवादास प्रतिबंध घालता येतो. दहशतवादास प्रतिबंध घालणे हो काही कोणत्या एका घटकाची जबाबदारी नाही. तर व्यक्ती, समाज, शासक, प्रशासक, पोलीस प्रशासन आणि सामान्य जनता यांच्यात समन्वय निर्माण झाल्यास दहशतवादाच्या समस्येचे समुळ उच्चाटन शक्य आहे. जगातून दहशतवादाची समस्या संपल्यास जगात लोकशाही, शांतता, सुरक्षीतता, नैतिकता, मानवतावाद, संस्कृती, अहिंसा यासारख्या मानवी मुल्यांची प्रतिष्ठापना होण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

१) ओझा एन.एन. - भारत एक विश्व २००९ क्रॉनिकल बुक्स, नई दिल्ली.

२) देवळाणकर शैलेंद्र - आंतरराष्ट्रीय संबंध, विद्याबुक्स, औरंगाबाद.

३) उदगांवकर म.न. - एकविसाव्या शतकातील दहशतवाद, डायमंड प्रकाशन, पुणे.

४) विजय खरे - जागतिकीकरणात शस्त्रास्त्र स्पर्धा, सुमेध प्रकाशन, पुणे.